वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ३६५३/२०२३ दिनांक :- ११/०५/२०२३

## प्रेसनोट

पुणे शहरातील कोंढवा वाहतुक विभागाचे हद्दीत संत गाडगे महाराज शाळा कोंढवा खुर्द ते भैरवनाथ मंदिर कोंढवा खुर्द या दरम्यान पिण्याचे पाईपलाईनचे काम करण्यात येणार आहे. सदर कामाकरीता दि. ११/०५/२०२३ ते दि. १०/०६/२०२३ या कालावधीमध्ये वाहतूकीत बदल करणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, कोंढवा वाहतुक विभागातील वाहतुकीत दि. ११/०५/२०२३ ते दि. १०/०६/२०२३ या कालावधीत खालीलप्रमाणे तात्पुरते स्वरुपात बदल करीत आहे.

### कोंढवा वाहतूक विभाग पुणे अंतर्गत

- शितल पेट्रोल पंप चौकाकडून ज्योती हॉटेल चौकाकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतूक बंद करण्यात येत आहे. ज्योती हॉटेल चौक ते शितल पेट्रोलपंप अशी एकेरी वाहतूक सुरु राहिल.

### पर्यायी मार्ग

- शितल पेट्रोल पंप चौकाकडून ज्योती हॉटेल चौकाकडे जाणारी वाहतूक वेलकम हॉल जंक्शन, मेफेअर सोसायटी जंक्शनमार्गे इच्छितस्थळी जाईल.

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रति,

**जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,**
**नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - १**

**प्रत :-**

१) **सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक** - ३, पुणे शहर
२) **पोलीस निरिक्षक, प्रेसरूम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) **प्रभारी अधिकारी कोंढवा** वाहतुक विभाग, पुणे शहर
४) **पोलीस निरीक्षक मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/-सदरची प्रेसनोट सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व ट्विटरवर अपलोड करावी.
सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित
प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

५) **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन अहवाल सादर करावा.

Scanned with OKEN Scanner